पीपीएफसी २९०३१०
आरबीआय/२००९-१०/३६५
डीजीबीए. सीडीडी. एच - **७५३०**/१५.०२.००१/२००९-१० मार्च २९, २०१०

अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक / स्टेट बँक ऑफ इंदौर / स्टेट बँक ऑफ पटियाला / स्टेट बँक ऑफ बिकानेर अँड जयपुर / स्टेट बँक ऑफ त्रावणकोर / स्टेट बँक ऑफ हैद्राबाद / स्टेट बँक ऑफ म्हैसूर/
अलाहाबाद बँक / बँक ऑफ बरोडा / बँक ऑफ इंडिया / बँक ऑफ महाराष्ट्र / कॅनरा बँक / सेंट्रल बँक ऑफ इंडिया / कार्पोरेशन बँक / देना बँक / इंडियन बँक / इंडियन ओव्हरसीज बँक / पजांब नॅशनल बँक / सिंडीकेट बँक / युको बँक / युनियन बँक ऑफ इंडिया / युनायटेड बँक ऑफ इंडिया
विजया बँक / आयडीबीआय बँक / आयसीआयसीआय बँक

महोदय/महोदया

**सार्वजनिक भविष्यनिधी योजना, १९६८ :**

**१) ठेवीची तारीख हिशेबात धरण्याबाबत स्पष्टिकरण**
**२) अल्पवयीन व्यक्तीसाठी खाते उघडण्याबाबतच्या सूचनांची पुनरावृत्ती.**

**१) चेक ने प्रदान केल्यास, पैसे भरल्याची तारीख ठरविणे:-**

अ) आपणास माहितच आहे की, वित्तमंत्रालयाचे पत्र क्र. एफ. ३(९) - पीडी/७२ दि. सप्टेंबर ४, १९७२ अनुसार, सार्वजनिक भविष्यनिधी योजना, १९६८ चया बाबत, "एखाद्या ग्राहक (सबस्क्रायबर) जेव्हा स्थानिक चेक वटविण्यासाठी पाठविल्यावर वटविला गेला पाहिजे" तथापि, भारतसरकारच्या (जीओआय) इतर सर्व लघु बचत योजनांबाबत, म्हणजे, पोस्ट ऑफिस बचत योजना (पीओएसएस) तसेच ज्येष्ठ नागरिक बचत योजना, २००४ (एससीएस एस) ह्याबाबत, ग्राहकाने एखाद्या चेकने (स्थानिक किंवा बाहेरगावच्या) अथवा ड्राफ्टने पीपीएफ खात्यात चेक जमा केल्यास, तो चेक किंवा ड्राफ्ट वटविला जाण्याची तारीख ही जमा झाल्याची तारीख समजली जाते.

ब) पीपीएफ तसेच पीओएसएस व एससीएसएस ह्यामधील जमा केल्याच्या हिशेबात धरण्याच्या तारखेत एकसूत्रता आणण्यासाठी, भारत सरकारने त्यांचे पत्र एफ. क्र. ७/७/२००८/ एनएस-२ दि. फेब्रुआरी १०,२०१० अन्वये ठरविले आहे की, ह्यानंतर, वित्तमंत्रालये पत्र क्र. ३(९) - पीडी/७२ कद. सप्टेंबर ४, १९७२ मध्ये बदल झाल्याचे समजून " ग्राहकाने पीपीएफ खात्यात स्थानिक चेक अथवा ड्राफ्टने पैसे जमा केले असल्यास ती रक्कम प्रत्यक्ष जमा होईल ती तारीखच जमा केल्याची तारीख समजली जाईल"

क) पीपीएफचा व्यवहार करणाऱ्या आपल्या शाखांच्या नजरेस ही सूचना / निदेश आणावा आणि ती संगणकीकृत प्रणालीमध्येही समाविष्ट करण्यात आली आहे ह्याची खात्री करुन घ्यावी.

**२) अल्पवयीन व्यक्तीसाठी खाते उघणे :**

अ) काही एजन्सी बँकांव्दारे अल्पवयीन व्यक्तीसाठी खाते उघडण्यास नकार दिला जात असल्याच्या तक्रारींबाबत विचार करता, येथे पुनश्च सांगण्यात येत आहे की, पीपीएफ योजना, १९६८ च्या नियम ३(१) अन्वये, एखादी व्यक्ती, तिच्या स्वतःच्या वतीने किंवा ती जिचा पालक आहे अशा एखाद्या अल्पवयीन व्यक्तीच्या सार्वजनिक भविष्यनिधी योजनेत पैसे भरु शकते. ह्याशिवाय पुनश्च सांगण्यात येत आहे की, वित्तमंत्रालयाचे पत्र एफ. ७/३४/८८/ एनएस २, दि. नोव्हेंबर १७, १९८९ अनुसार आधी स्पष्ट केल्याप्रमाणे एखादे वडिल किंवा आई (परंतु दोघेही मिळून नाही) त्याच्या / तिच्या अल्पवयीन बालकाच्या वतीने पीपीएफ खाते उघडू शकते.

ब) पीपीएफ योजनेचा व्यवहार करणाऱ्या आपल्या शाखांना ह्या सूचना पुनश्च कळवाव्यात.

आपली,

(संगीता लालवानी)
उप महाव्यवस्थापक